पुण्य नगरी

महाराष्ट्र शासन

# आदिवासी विकास विभाग

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

http://trti.maharashtra.gov.in

**टीआरटीआय, बार्टी, सारथी आणि महाज्योती या संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यसेवा (राजपत्रित) स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) करिता उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्याबाबत....**

टीआरटीआय, बार्टी, सारथी आणि महाज्योती या संस्थांमार्फत त्यांच्या लाभार्थी गटाच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासाकरिता विविध प्रकल्प, योजना राबविल्या जातात. तसेच सदर संस्थेच्या लाभार्थी गटातील युवक आणि युवतींकरीता विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. सदर स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनामार्फत सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले असून त्यानुसार उक्त संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यसेवा (राजपत्रित) स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेकरिता स्पर्धा परीक्षा पूर्व मार्गदर्शन देऊन शासकीय नोकरीची संधी मिळावी म्हणून खाजगी नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देणे करिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर योजनेचा सविस्तर तपशील, शासन निर्णय आवश्यक कागदपत्रे इ. बाबतच्या अधिक माहितीकरिता या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ http://trti.maharashtra.gov.in ला भेट देऊन या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरूनच ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावेत. सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी निवड ही सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test- CET) द्वारे गुणांकन पद्धतीने करण्यात येणार आहे.

पात्र व इच्छुक उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व सीईटी मधील प्राप्त गुणांनुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती यांचेकडे राहतील.

सही/-
(डॉ. राजेंद्र भारूड, भा.प्र.से.)
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
पुणे तथा अध्यक्ष, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती

डीजीआयपीआर/२०२४-२५/क्र-५/C-२५२

Mumbai Edition
Jun 18, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com